**नि.फौ.ख.क्र.३८/२०१३**

**सरकार –वि– जनार्धन जाधव**

**निशाणी क्र.**

**<u>सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ ची शपथेवर जबानी.</u>**

माझे नांव – प्रकाश जगन्नाथ शेळके

माझे वय – ४१

धंदा – शेती

राहणार – बोराळे ता. चांदवड जि. नाशिक.

**<u>सर–तपासणी सरकारतर्फे श्री. आर. एम. वाळके सहा. सरकारी अभियोक्ता</u>**

१. पोलीसांनी दि.२०.०५.२०१२ रोजी माझा जबाब घेतला होता. किरण दत्तोपंत पवार यांनी आरोपी क्र. १ कडून शेतीकामासाठी रक्कम रुपये ५०,०००/– घेतले होते. त्यांनी ते आरोपीला परत देखील केले होते.

**सरतपासपूर्ण**

**साक्षीदार सरकारी पक्षास सहकार्य करत नसल्यामुळे सरकारी वकीलांनी उलटतपासणीच्या स्वरुपातील सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. ती त्यांना देण्यात आली.**

२. हे म्हणणे खरे आहे की किरण पवार व आरोपी क्र. १ यांचा पैशाचा व्यवहार होता. हे म्हणणे खरे आहे की आरोपी क्र. १ हे व्याजाने पैसे देण्याचा व्यवसाय करतात. हे म्हणणे खरे आहे की आरोपी क्र. १ ने किरण पवार यांना देखील रक्कम रुपये ५०,०००/– व्याजाने दिले होते. हे म्हणणे खरे आहे की त्याबदल्यात आरोपी क्र. १ ने किरण पवार कडून दोन कोरे स्टॅम्प घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की त्यापैकी एका स्टॅम्प पेपरवर आरोपी क्र. १ ने किरण पवार कडून जनरल मुखत्यारपत्र लिहून घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की किरण पवार यांनी आरोपी

क्र. १ चे ५०,०००/– रुपये परत केल्यामुळे त्यांनी आरोपी क्र. १ कडून जनरल मुखत्यारपत्र व दुसरा कोरा स्टॅम्प परत मागितलेला होता. हे म्हणणे खरे आहे की आरोपी क्र. १ ने किरण पवार यांना जनरल मुखत्यारपत्र परत न दिल्यामुळे त्यांनी अॅड. लोंढे यांच्याकडून आरोपी क्र. १ यांना सदरचे जनरल मुखत्यारपत्र रद्द केल्याबाबत नोटीस पाठविली होती. हे म्हणणे खरे आहे की आरोपी क्र. १ ने ती नोटीस घेतली नाही व किरण पवार यांच्या जमिन मिळकतीवर निवृत्ती शेळके विकास सोसायटीचा बोझा असतांनाही खोटा उतारा देऊन त्यामिळकतीचे गावकामगार तलाठीला हाताशी धरुन आरोपी क्र. २ च्या नावे खोटे खरेदीखत करुन घेतले. हे म्हणणे खरे आहे की त्या जमिन मिळकतीवर सोसायटीचा बोझा असतांनाही सहदुय्यम निबंधंक चांदवड यांनी तो दस्त नोंदवून घेतला होता. हे म्हणणे खरे आहे की आरोपी क्र. १ ने किरण पवारला ५०,०००/– रुपये दिले त्यावेळी व किरण पवारने ते ५०,०००/– रुपये आरोपी क्र. १ ला परत केले त्या दोन्ही वेळी मी हजर होतो. हे म्हणणे खरे आहे की त्यावेळी साक्षीदार क्र. २ संतोष पवार देखील हजर होते. हे म्हणणे खरे आहे की माझा जबाब सन २०१२ मध्ये नोंदविलेला असल्यामुळे तो मला आज आठवत नव्हता. मी आरोपी क्र. १ ला ओळखतो. तो आज न्यायालयात हजर आहे. माझ्या जबाबातील अधोरेखांकित भाग अ मी पोलीसांना सांगितला होता त्यानुसार तो त्यांनी नोंदविलेला आहे.

**उलटतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीचे वकील श्री. जे.के. गुंजाळ यांच्यातर्फे सुरु**

३. किरण पवारने आरोपी क्र. १ ला कोणत्या तारखेला पैसे परत दिले ती नेमकी तारीख मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांनी माझा जबाब आधिच लिहून ठेवला होता त्याबाबत मला काहीही माहिती नव्हती. किरण पवार आमच्या गल्लीमध्ये राहत होते त्यामुळे मी त्यांना ओळखत होतो. हे म्हणणे खरे आहे की किरण पवार व त्याची पत्नी जयश्री सोबत माझे चांगले संबंध आहेत.

आरोपी क्र. १ व किरण पवार यांच्यामध्ये कोण–कोणते व्यवहार व दस्त झाले होते याविषयी मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की आरोपी क्र. १ व्याजाने पैसे देतो तो सावकारीचा व्यवसाय करतो हे दाखविण्यासाठी माझ्या तोंडी शब्दांव्यतिरिक्त माझ्याकडे कोणताही पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की आरोपी क्र. १ चा सावकारीचा व्यवसाय असल्याची माझी ऐकीव माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की किरण पवार व आरोपी क्र. १ मध्ये जे दस्त झाले त्यापैकी कोणत्याही दस्तावर मी साक्षीदार नाही. हे म्हणणे खरे आहे की किरण पवारने आरोपी क्र. १ ला अॅड. लोंढे यांच्या मार्फत जनरल मुखत्यारपत्र रद्द करण्याची नोटीस कधी पाठविली व कशा पद्धतीने पाठविली याबाबत मला वैयक्तिक काहीही माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की आरोपी क्र. १ ने तलाठी, दुय्यम निबंधक चांदवड यांना हाताशी धरुन खोटे खरेदीपत्र करुन घेतले असे किरण पवारचे मत होते. त्याबाबत मला वैयक्तिक काहीही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपी क्र. १ ला किरण पवारने ५०,०००/– रुपये माझ्यासमक्ष परत केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की आरोपी क्र. १ ला किरण पवारने ५०,०००/– रुपये परत देतांना मी व साक्षीदार क्र. २ संतोष पवार हजर असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की मला सदर प्रकरणाची काहीही माहिती नसतांना केवळ फिर्यादीच्या पत्नीच्या सांगण्यावरुन मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

SUNGARE VRUSHALI DINANATH
Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2025.07.05 11:08:17 +0530

**दि. ०४.०७.२०२५** **(वृषाली दी. सुंगारे)**

**सह दिवाणी न्यायदंडाधिकारी,**

**चांदवड.**